ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

ISO 9001:2000

वर्ष : २१ अंक : २४३

मुंबई, २६ सप्टेंबर २००९ (पृष्ठ १२+

मूल्य : २.५० रुपये ★ ★ शहर आवृत्ती

epaper.saamana.com

संपादक : बाळ ठाकरे

शनिवार

## अध्यात्म

# रुद्राक्ष प्राचीन हिलिंग पद्धत

**रुद्राक्ष** हे त्याच्या अद्‌भुत व गूढ गुणधर्मामुळे लोकांचे आकर्षण ठरला आहे. गेली १५ वर्षे रुद्राक्षावर माझे संशोधन चालू आहे. रुद्राक्षाच्या औषधी गुणांबरोबरच ते सेल्फ हिलिंगसाठी देखील वापरले जाते. धार्मिक वृत्तीचे लोक मंत्रपठण व जप यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या माळा वापरतात. परंतु त्यामध्ये रुद्राक्षाच्या माळेचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे असे शास्त्र सांगते. याला वैज्ञानिक आधारदेखील आहे. जेव्हा रुद्राक्षाची माळ मंत्र जपण्यासाठी दोन बोटांमध्ये पकडली जाते तेव्हा एक प्रकारचा विद्युतप्रवाह निर्माण होऊन तो आपल्या मेंदूपर्यंत पोहोचला जातो. ऊर्जा मोजण्याच्या यंत्राने असे दर्शविले जाते की, रुद्राक्ष, शालीग्राम, उल्कापिंड तसेच वेगवेगळ्या प्रकारचे ऊर्जामान पदार्थामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे सूक्ष्म प्रवाह व ध्वनी असतात. या पदार्थामध्ये वातावरणातील दूषित एनर्जी बदलण्याची क्षमता असते. मनुष्याच्या शरीरामध्ये सांधारण ९ ते १२ मि.लि. व्होल्टेज एवढा विद्युतप्रवाह असतो. रुद्राक्ष धारण केल्यानंतर हाच विद्युतप्रवाह ६ ते ७ मि.लि. व्होल्ट इतका होतो. रुद्राक्षाला पाण्यात बुडवल्यानंतर त्यामधील विद्युतशक्ती पाण्यात मिसळते. रुद्राक्ष शरीरातील कोषिकांना सक्रिय करून मनामध्ये इलेक्ट्रॉनिक संकेत पोहोचवितात. ज्यामुळे उच्च रक्तदाबाच्या विकारावर नियंत्रण मिळू शकते. प्रत्येक व्यक्तीच्या मेंदूमधून एक प्रकारची रेडिओ तरंगासारखी ऊर्जा लहरी प्रक्षेपित होत असतात. त्याची लांबी आणि प्रवाह मोजू शकतो. १३ चक्र प्रति सेकंद यापेक्षा अधिक फ्रिक्वेन्सी जागृत अवस्थामध्ये दर्शविली जाते. त्याला बिटा अवस्था म्हटले जाते. ७.५ ते १३ चक्र प्रतिसेकंद फ्रिक्वेन्सी याला अल्फा अवस्था असे म्हटले जाते याचाच अर्थ व्यक्ती विश्राम किंवा ध्यानावस्थेत असते. ३.३ ते ०.५ चक्र प्रतिसेकंद फ्रिक्वेन्सी असल्यास याला थिटा अवस्था म्हणतात. व्यक्ती अगदी खोल ध्यानात जाते तेव्हा ही अवस्था प्राप्त होते. रुद्राक्ष धारण केल्यावर त्याच्या चुंबकीय गुणधर्मामुळे मस्तकातून निघणाऱ्या विद्युत लहरींवर त्याचा परिणाम होऊन एक वेगळीच मनःशांती अनुभवास येते. गळ्यामध्ये घालणाऱ्या माळेमध्ये रुद्राक्षांची संख्या १०८ असल्यास ती शुभ मानावी. १०८ संख्येचे महत्त्व असे आहे की, आपली उपनिषदही तितकीच असतात तसेच २७ नक्षत्र व प्रत्येकाचे ४ चरण मिळून त्याची १०८ ही ब्रह्मांडीय संख्या होते. शरीरातदेखील १०८ संवेदनबिंदू आहेत. तसेच हिंदुस्थानी अध्यात्मामध्ये ९ अंकाला महत्त्व आहे. आपले नर्वाण मंत्र ९ आहेत. ग्रह ९ आहेत. नवरात्रीमधील शक्ती देवता ९ आहेत. १०८ या अंकांची बेरीजदेखील ९ आहे. १ मुखी ते २१ मुखी रुद्राक्ष बाजारात मिळतात. यामध्ये गणेशमुखी, गौरीशंकरमुखी, सवार, त्रिजुटी असे वेगवेगळ्या प्रकारचे रुद्राक्ष मिळतात. त्रिजुटी रुद्राक्षाला ब्रह्मा-विष्णू-महेश रुद्राक्ष असे म्हणतात. हे रुद्राक्ष यशप्राप्ती तसेच संकट परिहारासाठी परिधान करतात. वास्तुदोष निर्मूलन करण्यासाठी दरवाजाच्या दोन्ही कोनांमध्ये त्रिजुटी रुद्राक्ष लावावे व चौकटीच्या मध्ये गणेश रुद्राक्ष विधिपूर्वक स्थापित करावे. यामुळे दिशादोष तसेच घरातील ऋणात्मक ऊर्जेचे निर्मूलन होते. सर्वसाधारण लोकांनी सप्तमुखी रुद्राक्ष जे महालक्ष्मी देवीचे प्रतीक आहे ते धारण करावे किंवा अष्टमुखी रुद्राक्ष जे गणेशाचे प्रतीक आहे ते धारण करावे.



✍ तुषार यशवंत सावडावकर

बी.ए; एम.बी.ए; वास्तुतज्ज्ञ, नॅचरो थेरपिस्ट

९८९२१५९७१५